# 'रंगकर्मी' आज प्रेक्षकांच्या भेटीला



नाशिक, दि. २७ (प्रतिनिधी)- शशी सुमित मोशन पिक्चर्सने महाराष्ट्रातील लहान शहरांमध्ये त्यांचा पहिला मराठी चित्रपट 'रंगकर्मी'च्या पुनःप्रदर्शनाची घोषणा केली. हा चित्रपट कराड, नाशिक, मिरज, सिन्नर, कोपरगाव, विटा, नगर, लासलगाव, नांदेड, बार्शी औरंगाबाद, परळी, इस्लामपूर या शहरांमध्ये प्रदर्शित होईल. हा चित्रपट अधिकृतरीत्या २७ डिसेंबर २०१३ रोजी राष्ट्रीय स्तरावर प्रदर्शित झाला होता. २८ फेब्रुवारी २०१४ रोजी महाराष्ट्रातील १३ छोट्या शहरांमध्ये हा चित्रपट पुनः प्रदर्शित होणार आहे. शशी आणि सुमित मित्तल यांचे या चित्रपटाद्वारे निर्माते म्हणून अधिकृत पदार्पण झाले. या चित्रपटात प्रसिद्ध कलाकार डॉ. अमोल कोल्हे, मोहन जोशी, शीतल दाभोळकर आणि शर्मिष्ठा राऊत आदींचा समावेश आहे.